**राज्यातील खाजगी मान्यताप्राप्त कायम विनाअनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील पालक-शिक्षक संघाची स्थापनेसंदर्भात मार्गदर्शक तत्वे**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : पीटीए २०१०/(३४७/१०)/माशि-२**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : २४ ऑगस्ट, २०१०**

**<u>वाचा :</u>** १) शासन निर्णय क्र. एसएसएन-२६९६/प्र.क्र.६२२/९६/माशि-२, दि.१६ मे,१९९६
२) शासन निर्णय क्र. एसएसएन-१०९९/प्र.क्र.२७/९९/माशि-२, दि.२२ मे,२०००
३) शासन निर्णय क्र. एसएसएन-२१०३/प्र.क्र.५०/०३/माशि-२, दि.२७ मे,२००३
४) शासन निर्णय क्र. संकीर्ण २००९/प्र.क्र.(१०८/०९)/माशि-३, दि. २१ मे,२०१०
५) शासन निर्णय क्र. संकीर्ण २००९/प्र.क्र.(१०८/०९)/माशि-३, दि. १५ जुलै,२०१०

**प्रस्तावना :-**

राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या भौतिक, शैक्षणिक व विद्यार्थी विकासाच्या संदर्भातील समस्या सोडविण्यासाठी व शालेय कामकाजामध्ये पालकांचा सक्रीय सहभाग व सहयोग वाढविण्यासाठी उपरोक्त दिनांक १६ मे,१९९६ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक मान्यताप्राप्त शाळेत पालक शिक्षक संघाची स्थापना करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने माध्यमिक शाळा संहितेतील नियम क्रमांक ३.२ मध्ये तदनुषंगिक तरतूद करण्यात आलेली आहे.

पालक शिक्षक संघाच्या संदर्भात "फोरम फॉर फेअरनेस इन एज्युकेशन" या स्वयंसेवी संस्थेने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे २२९७/९८ ही याचिका दाखल केलेली केलेली होती. त्यानुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दिलेली मार्गदर्शक तत्वे लागू करण्याबाबत दि.१ फेब्रुवारी,१९९९ रोजी निदेश दिलेले होते. त्या निदेशानुसार दि.१ एप्रिल,१९९९ रोजी शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते. ते दि.२२ मे,२००० च्या शासन निर्णयान्वये अधिक्रमीत करुन त्या दिनांकापासून नवीन मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली होती व त्याच अनुषंगाने टी.एम.ए. पै फाऊंडेशन विरुध्द कर्नाटक शासन व इतर या याचिकेमध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार दि.२७ मे,२००३ च्या शासन निर्णयात शैक्षणिक शुल्क विहित करण्यासाठी पालक शिक्षक संघाचे महत्व नमूद करण्यात आलेले आहे.

मा.उच्च न्यायालय,मुंबई येथील याचिका क्र.४५०३/०९ मधील निर्णयानुसार श्रीमती कुमुद बन्सल यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. या समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने प्रारुप शासन निर्णय दि.२१ मे,२०१० रोजी निर्गमित केलेला आहे. या शासन निर्णयावर शिक्षणविषयक

संघटना/ शिक्षण संस्था/पालक शिक्षक संघ यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने प्रधान सचिव, शालेय शिक्षण यांनी सर्वसंबंधितांची दिनांक २८ जून,२०१० रोजी एक सुनावणी घेण्यात आली होती. श्रीमती बन्सल समितीने केलेल्या शिफारशींमध्ये सुध्दा पालक शिक्षक संघाची महत्वाची भूमिका विषद केली आहे. त्या अनुषंगाने व उपरोक्त परिच्छेदात नमूद केलेल्या बाबीच्या संदर्भात पालक शिक्षक संघाबाबत एकत्रित मार्गदर्शक तत्वे लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

प्रस्तावनेमध्ये नमूद केलेल्या वस्तुस्थितीच्या अनुषंगाने शासन आता पुढील आदेश देत आहे--

पालक शिक्षक संघाच्या संदर्भात यापूर्वी जे शासन निर्णय, परिपत्रके निर्गमित झालेले आहेत ती सर्व या शासन निर्णयान्वये अधिक्रमीत करुन खालील प्रमाणे नवीन विहित मार्गदर्शक तत्वे लागू करण्यात येत आहेत. सदरची मार्गदर्शक तत्वे राज्यातील राज्य शासनाने मान्यता दिलेल्या कायम विनाअनुदानित शाळा, विनाअनुदानित शाळा तसेच राज्यातील कार्यरत असलेली अन्य शिक्षण मंडळाशी (सी बी एस ई, आय सी एस ई आणि आय बी ) संलग्न असलेल्या शाळांना या शासन आदेशाची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे.

**मार्गदर्शक तत्वे**

(१) शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांचे पालक हे पालक शिक्षक संघाचे सभासद असतील.

(२) पालक शिक्षक संघाची कर्तव्ये खालील प्रमाणे असतील-

(अ) नियोजनाप्रमाणे अभ्यासक्रम पूर्ण होईल हे पाहणे,

(ब) अभ्यासात कमकुवत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी योग्य त्या उपाययोजना सुचविणे

(क) अभ्यासाशी पूरक असलेल्या अभ्यासक्रमाचे नियोजन करण्यास शाळांना सहाय्य करणे

(ड) सह शालेय उपक्रमांना मान्यता देणे,

(इ) शाळेतील शैक्षणिक शुल्क , सत्र फी व सह शालेय उपक्रमासाठी आकारण्यात येणा-या शुल्कासंबंधी माहिती घेऊन पालक शिक्षक संघाच्या कार्यकारी समितीपुढे त्यांचे म्हणणे मांडणे.

(३) पालक शिक्षक संघाचा मूळ उद्देश विद्यार्थी व शिक्षकांच्या समस्या सोडविणे हा आहे. पालक शिक्षक संघाने शाळेच्या दैनंदिन कामकाज व प्रशासनात लक्ष घालणे अपेक्षित नाही.

(४) शूल्क निश्चितीच्या प्रक्रीयेमध्ये पारदर्शकता असणे आवश्यक आहे. या संदर्भात पालक-शिक्षक संघाची भुमिका अत्यंत महत्वाची असेल. प्रत्येक शाळेमध्ये पालक-शिक्षक संघ स्थापन करणे अनिवार्य आहे. तथापि ज्या शाळांमध्ये अशा संघाची स्थापना अद्याप झालेली नसेल त्या शाळांमध्ये अशा संघाची स्थापना करणे सर्व शाळांना बंधनकारक आहे. पालक-शिक्षक संघाची रचना व कार्यपध्दती पुढीलप्रमाणे असेल --

**(अ)** राज्यातील मान्यताप्राप्त विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित व राज्यात कार्यरत असलेल्या राज्य शिक्षण मंडळाशी व अन्य शिक्षण मंडळांशी (C. B .S .E., I.C.S.E. इत्यादी ) संलग्न असलेल्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून ३० दिवसांच्या आत पालक-शिक्षक संघाची स्थापना करावी.

**(ब)** शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांचे पालक हे पालक-शिक्षक संघाचे सभासद असतील.

**(क)** पालक शिक्षक संघाची स्थापना झाल्यानंतर पालक शिक्षक संघाच्या कार्यकारी समितीची निवड शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी पालक शिक्षक संघाच्या सर्वसाधारण सभेने करावी. या बैठकीसाठी सर्वसाधारण सभेच्या एकूण सभासदांपैकी किमान ५० टक्के सभासद उपस्थित असणे अनिवार्य आहे. या सभेमध्ये जर जास्त उमेदवार, कार्यकारी समितीवर प्रतिनिधीत्वासाठी उत्सुक असतील तर अशावेळी सोडत पध्दतीने उमेदवाराची निवड शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून दोन आठवडयात करण्यात यावी व पारदर्शी पध्दतीने दोन आठवडयात कार्यकारी समिती गठीत करण्यात येईल. त्यासाठी घ्यावयाच्या बैठकीची सूचना सर्व संबंधितांना मुख्याध्यापकाकडून पत्रकाव्दारे तसेच शाळेच्या संकेत स्थळावर एक आठवडा अगोदर देण्यात येईल.

**(ड)** पालक शिक्षक संघाच्या कार्यकारी समितीची रचना पुढील प्रमाणे राहील :--

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | ---- | प्राचार्य/मुख्याध्यापक |
| उपाध्यक्ष | ---- | पालकांमधून एक |
| सचिव | ---- | शिक्षकांमधून एक |
| सहसचिव (२) | ---- | पालकांमधून एक व शिक्षकांमधून एक |
| सदस्य | ---- | प्रत्येक इयत्तेतील एक शिक्षक<br>प्रत्येक तुकडीसाठी एक पालक<br>(जेवढया तुकडया तेवढे पालक सदस्य) |

**(इ)** कार्यकारिणी समितीमधील सदस्यांमध्ये ५० टक्के महिला सदस्य असतील.

**(ई )** पालक शिक्षक संघाच्या कार्यकारी समितीच्या सदस्यांच्या नावाची यादी शाळेच्या सूचना फलकावर तसेच संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.

**(प)** सर्व प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांकडून पालक शिक्षक संघाची स्थापना केल्यानंतर १५ दिवसांच्या आत सभासदांच्या नावाची यादी व कार्यकारी समितीच्या सदस्यांची यादी संबंधित शिक्षणाधिकारी/शिक्षण निरीक्षक यांच्याकडे सादर करण्यात येईल.

(फ) पालक शिक्षक संघाच्या कार्यकारी समितीची मुदत दोन वर्ष राहील. कोणत्याही पालकास एकदा पदाधिकारी अथवा कार्यकारी समितीचा सदस्य झाल्यानंतर त्यानंतरच्या पाच वर्षात पदाधिकारी अथवा कार्यकारी समितीचा सदस्य होता येणार नाही.

(भ) कार्यकारी समितीची बैठक दोन महिन्यातून किमान एकदा घेण्यात यावी.

(य) सर्व बैठकांची सूचना पत्रकाव्दारे विषयपत्रिकेसह सर्व सभासदांना आगाऊ पाठविण्यात येईल.

(र) बैठकीचे स्वाक्षरीत इतिवृत्त नोंदवहीत ठेवून ती नोंदवही जतन करुन ठेवण्यात येईल. तसेच इतिवृत्तास कार्यकारी समितीने मान्यता दिल्यानंतर सदर इतिवृत्त शाळेच्या सूचना फलकावर प्रदर्शित करणे व शाळेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे व्यवस्थापनावर बंधनकारक राहील.

(ल) शाळेकडून पालक-विद्यार्थ्यांकरिता दर्शनी भागात एक स्वतंत्र सूचना पेटी उपलब्ध करुन देण्यात येईल.

(व) पालक शिक्षक संघाबाबतची सर्व परिपत्रके, शासन निर्णय, उच्च न्यायालयाचे निर्णय, सूचना तसेच कार्यकारीणीतील सदस्यांची नांवे संपर्क क्रमांक, कार्यकारिणी समितीच्या बैठकांचे इतिवृत्त इत्यादी सर्व कागदपत्रे सूचना फलकावर/ शाळेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येतील.

(श) पालक शिक्षक संघाच्या वर्षातून दोन बैठका घेण्यात येतील. प्रत्येक बैठकीत सहा महिन्यापेक्षा अधिक अंतर असू नये. सदर बैठकीची कार्यसूची पालक शिक्षक संघाच्या सदस्यांना किमान १५ दिवस अगोदर हस्तदेय स्वरुपात वितरित करण्यात येईल. पालक शिक्षक संघापुढे शैक्षणिक शुल्क निश्चितीचा विषय प्रथम चर्चेसाठी ठेवण्यात येईल व त्यामध्ये प्राप्त होणा-या सूचनांची नोंद कार्यकारी समिती घेईल.

ज्या शाळा या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करणार नाहीत किंवा त्याचे उल्लंघन करतील त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याबरोबरच शाळेची मान्यता काढून घेण्याची अंतिम कार्यवाही करण्यात येईल. तसेच अन्य संलग्न मंडळाचे अभ्यासक्रम राबविणा-या संस्थेचे, शाळेचे नाहरकत प्रमाणपत्र काढून घेण्यासंबंधी संबंधित मंडळास संलग्नता काढून घेण्याबाबत राज्य शासनाकडून शिफारस करण्यात येईल.

सर्व क्षेत्रीय अधिका-यांनी हा शासन निर्णय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा व त्याच्या अंमलबजावणीबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www. maharashtra. gov.in वर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्र. **२०१००८२४१३२५५३००१** असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**(अ.मा.भट्टलवार )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,मंत्रालय, मुंबई
शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद
शिक्षण निरीक्षक (पश्चिम/उत्तर/दक्षिण), बृहन्मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हा परिषद
अध्यक्ष/सचिव, आय.सी.एस.ई., सी.बी.एस.ई., आय.जी.सी.एस.ई. , आय.बी.
मा.मंत्री व मा.राज्यमंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव
उपसचिव (प्राथमिक), शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
अवर सचिव (प्राशि-१/प्राशि-३/माशि-१/माशि-३/उमाशि-१),शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती, कार्यासन माशि-२.